RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक ५६(२)] बुधवार, मे ९, २०१८/वैशाख १९, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १२८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ मे २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर १२१८/प्र.क्र.३३/कराधान-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही.

म्हणून, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच या संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये, खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेचः—

१. या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) नियम, २०१८ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल), च्या नियम ३ मध्ये, उप-नियम (१) मध्ये, खालील परंतुके दाखल करण्यात येत आहेत, म्हणजेच :-

"परंतु असेकी, अर्जदार त्याच्या विकल्पानुसार त्याच्या मुख्य कामाच्या ठिकाणासाठी विहित प्राधिकाऱ्याकडे एकच अर्ज करु शकेल. अशा प्रकरणी अर्जदार हा कामाची इतर ठिकाणे ही कामाची अतिरिक्त ठिकाणे असल्याचे घोषित करील :

परंतु आणखी असेकी, आधीच एकापेक्षा जास्त नोंदणी प्रमाणपत्रे धारण करत असलेला मालक, त्याच्या विकल्पानुसार त्यातील एक कामाचे ठिकाण हे कामाचे मुख्य ठिकाण म्हणून घोषित करण्यासाठी आणि इतर कामाच्या ठिकाणासाठी देण्यात आलेली नोंदणी प्रमाणपत्रे, ती कामाची ठिकाणे ज्या विहित प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात येत असतील त्याच्याकडे रद्द करण्यासाठी अर्ज सादर करील.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 9th May 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PT1218/CR 33 /Taxation-3.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* read with the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely :—

1. These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Rules, 2018.

2. In rule 3 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, in sub-rule (1), the following provisos shall be added, namely :—

"Provided that, the applicant may, at his option make a single application to the prescribed authority for his principal place of work. In such case the applicant shall declare other places of work as additional places of work:

Provided further that, an employer already holding more than one certificate of registration may, at this option apply for declaration of one of his place of work as principal place of work and for cancellation of certificates of registration granted for the other places of work, to the prescribed authority, under whose jurisdiction his place of work falls.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.